# रा.भा.शिर्के प्रशाला, रत्नागिरी

प्रशालेत मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक मिळून ३९ शिक्षक व ११ शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत आहेत. या शाळेची विद्यार्थी संख्या १५२८एवढी आहे. प्रशालेचे विद्यार्थी अलौकिक गुणांच्या आधारे उत्तुंग गगनाला गवसणी घालण्याचा प्रयत्न करीत आहेत त्याचाच थोडक्यात आढावा.

* **इयत्ता १० वी २०१९ निकाल** – २८३/३०८, ९१.८८% ,या परीक्षेत कुमारी भितळे प्राची दीपक कुमारी जोशी दिशा हेमंत, कुमारी शेट्ये मृणाल जयकुमार, कु. हाके निरंजन नानासाहेब या विद्यार्थ्यांनी उत्तम यश संपादन केले. विशेष प्राविण्य (Dist.) सह ९७, प्रथम श्रेणीत ९१, द्वितीय श्रेणीत ७८, तृतीय श्रेणीत १७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

* **शिष्यवृत्ती विभाग** : शैक्षणिक वर्ष२०१९–२०मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी ५वी चे ७१ विद्यार्थी परीक्षेला बसले, शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी संख्या १२ उत्तीर्ण विद्यार्थी ४८ अनुत्तीर्ण विद्यार्थी २३ निकाल ६७.६० % आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी ८ वी चे ६५ विद्यार्थी परीक्षेला बसले, शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी संख्या १०, राज्य गुणवत्ताधारक ०१ कुमार संकेत रामचंद्र फड, उत्तीर्ण विद्यार्थी ३६ अनुत्तीर्ण विद्यार्थी २९ निकाल ५५.३८ %

* **संस्कृत विभाग**: शैक्षणिक वर्ष २०१८–१९ मध्ये इयत्ता १०वी संपूर्ण संस्कृत, संयुक्त संस्कृत विषयाचा निकाल १००% लागला. सदर शैक्षणिक वर्षात हस्ताक्षर, पाठांतर, शुद्धलेखन अशा विविध प्रकारच्या स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच संस्कृतभारतीची प्रवेश परीक्षा, परिचय परीक्षा, रत्नागिरी नगरपरिषदेतर्फे घेतल्या गेलेल्या स्पर्धा, युनायटेड हायस्कूल आयोजित सुभाषित वक्तृत्व स्पर्धा, गोगटे जोगळेकर महाविद्यालय अमरकोष पाठांतर स्पर्धा यात अनेक विद्यार्थी सहभागी झाले होते. यात विद्यार्थांना उत्तम यश मिळाले. कालिदास–विषय–चित्रप्रदर्शन, संस्कृत ग्रंथ प्रदर्शन, भगवद्गीता पठण कार्यक्रम, संस्कृत परिचय वर्ग संपन्न झाले.

* **हस्तलिखित**: वार्षिक स्नेहसंमेलनांतर्गत उपक्रमांचा एक भाग म्हणून प्रशालेत 'विकास' हे हस्तलिखित तयार केले जाते. चालू वर्षीही हस्तलिखिताचे सांस्कृतिक कार्यक्रमाच्या मुख्य दिवशी मान्यवरांच्या हस्ते अनावरण झाले. राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून प्रशालेतील विद्यार्थ्यांनी निर्मिलेले विज्ञान हस्तलिखित 'जिज्ञासा' याचे अनावरण करण्यात आले.

* **व्यवसाय मार्गदर्शन** – व्यवसाय मार्गदर्शन विभागामार्फत हॉटेल व्यवसायातील संधी व अभियांत्रिकी अभ्यासक्रम या विषयाच्या मार्गदर्शन कार्यक्रमासाठी रत्नागिरीतील प्रथितयश हॉटेल व्यावसायीक श्री. लोध सर व फिनोलेक्स ॲकेडमीचे प्रा.डॉ.यादव यांना निमंत्रित करण्यात आले. वाणिज्य अभ्यासक्रमाची माहिती आणि संधी या विषयक मार्गदर्शनपर वर्गासाठी शाळेचे माजी विद्यार्थी श्री.चैतन्य वैद्य व श्रीम.मयुरी भुवड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दि.१/७/२०१९ रोजी प्रशालेचे माजी विदयार्थी श्री.कोपर्डीकर (संशोधक नासा)व श्री.डॉ.काळे सर (पुणे)यांनी विद्यार्थ्यांना 'परदेशातील शिक्षण पद्धती आणि अभ्यास तंत्र' या विषयक मार्गदर्शन केले. दि.१९/१२/२०१९ रोजी इ.१०वी साठी 'ताणतणाव व्यवस्थापन' या विषयी डॉ. मंजूषा कुलकर्णी(बालरोग तज्ञ) व डॉ.सुमेधा रानडे (बालरोग तज्ञ) यांनी मार्गदर्शन केले. दि.२१/१२/२०१९ रोजी शासकीय तंत्रनिकेतन व MKCL यांच्या संयुक्त विद्यमाने इ.१० वी साठी करिअर 'मार्गदर्शन मेळावा 'आयोजित करण्यात आला.

* **चित्रकला विभाग**: आर्ट सर्कल रत्नागिरी आयोजित गणपती मूर्ती तयार करणे स्पर्धा २०१९, महाराष्ट्र शासनामार्फत घेण्यात येणारी बालचित्रकला स्पर्धा, जिल्हा शासकीय रुग्णालय, रत्नागिरी आयोजित आत्महत्या प्रतिबंधात्मक दिन पोस्टर स्पर्धा, रत्नागिरी खबरदार आयोजित बाळा मलुष्टे यांच्या स्मरणार्थ शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा, स्वच्छता अभियान चित्रकला / स्लोगन स्पर्धा, ओम साई मित्रमंडळ नाचणे आयोजित चित्रकला स्पर्धा, जागतिक वारसा दिन निमित्त थिबापॅलेस स्केचिंग स्पर्धा, शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षा–सप्टेंबर २०१९–एलिमेंटरी सहभागी विद्यार्थी ७०, इंटरमिजीएट सहभागी विद्यार्थी ४५ एकूण ११५ विद्यार्थी. अशा विविध स्पर्धात सहभागी होऊन विद्यार्थ्यांनी उत्तम यश संपादन केले आहे.

**शारीरिक शिक्षण विभाग** : सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात रा.भा.शिर्के प्रशालेत क्रीडा विभागामार्फत प्रशालेचे खो-खो, कबड्डी, अ‍ॅथलेटीक्स, बुद्धीबळ, व कॅरम, क्रिकेट, तलवारबाजी, धर्नुविद्या, योग, स्केटींग, कुस्ती, व्हॉलीबॉल इ.प्रकारच्या खेळांच्या शासकीय व खाजगी स्पर्धामध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन उत्तम यश संपादन केले आहे.

* राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी खेळाडू : *आकांक्षा उदय कदम (कॅरम), *मयुरी मिलिंद कदम (तायक्वांदो), यश प्रसाद गोगटे (बुद्धीबळ) *श्रीपाद रजनीश पोकळे (किक बॉक्सींग)

* राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी खेळाडू: * समिरा सचिन शिंदे (कॅरम) * प्रेरणा सचिन राठोड (कॅरम) *निर्वाण मिलिंद कांबळे(कॅरम) * सुयश जयवंत शिंदे (कॅरम), * वेदान्त सुरज चव्हाण (तायक्वांदो),* क्रीश भगवान डोईफोडे (बुद्धीबळ), *तनया महेश मिलके (जलतरण) *मार्तंड संजय झोरे (वेटलिफ्टींग, धर्नुविद्या) * श्रीया संजय झोरे (वेटलिफ्टींग, धर्नुविद्या, तलवारबाजी), *प्रथम भालचंद्र म्हाडदळकर (क्रिकेट), * हर्षवर्धन रवींद्र कांबळे (बॅडमिंटन), *सिध्दी शशिकांत करंडे (खो-खो) *सायली दिलीप कर्लेकर (खो-खो),* सांची किरण कांबळे (खो-खो),*गायत्री विनायक भोसले (खो-खो)

* २ फेब्रुवारी२०२० रोजी जागतिक सूर्यनमस्कार दिनाचे आयोजन करण्यात आले.

* **वार्षिक क्रीडा महोत्सव** : रा.भा.शिर्के प्रशालेत दि.२ व ३ डिसेंबर २०१९ रोजी वार्षिक क्रीडा महोत्सव घेण्यात आला. यात इयत्ता ५ वी ते १० वी चे एकूण ४५ संघ सहभागी झाले. या क्रीडा महोत्सवात लगोरी, क्रिकेट, व्हॉलीबॉल, लंगडी इत्यादी क्रीडा प्रकाराचा समावेश करण्यात आला. सकाळ सत्रात - प्रमुख उद्घाटक माजी विद्यार्थी श्री.सुभाष पटवर्धन व श्रीमती स्नेहल सावंत उपस्थित होते. दुपार सत्रात - प्रमुख उद्घाटक माजी विद्यार्थी श्री.पराग पानवलकर व कु.आरती कांबळे तसेच र.ए.सोसायटीच्या कार्याध्यक्षा श्रीमती शिल्पाताई पटवर्धन, आसमंत फाऊंडेशनचे श्री.नंदकुमार पटवर्धन उपस्थित होते.

* **स्वराज्य सभा आणि सांस्कृतिक विभाग** : जागतिक योगदिन, जागतिक लोकसंख्या विस्फोटदिन, छत्रपती शाहू महाराज जयंती,१०वी गुणगौरव समारंभ, गुरुपौर्णिमा समारंभ, ध्वज स्वीकृत दिन, कारगिल दिन, लो.टिळक पुण्यतिथी, क्रांतिदिन, स्वातंत्र्यदिन, रक्षाबंधन, संस्कृत दिन, शिक्षक दिन, कै.बाबूराव जोशी दिन, श्रीम. बागवे मॅडम निरोप समारंभ, म.गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती, वाचन प्रेरणा दिन, विद्यार्थी दिन, बालदिन, बिरसा मुंडा जयंती दिन, बालक सुरक्षा सप्ताह, इत्यादी दिवस पार पडले.

* **स्पर्धा परीक्षा**-१. NMMS परीक्षाः राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा (NMMS परीक्षा) राष्ट्रीयस्तरावर घेण्यात येते. सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रशालेतील इ.८ वी तील १५ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. या परीक्षेमध्ये प्रशालेतील १५ विद्यार्थ्यांपैकी ७ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले. या ७ विद्यार्थ्यांना १२०००/-रु.प्रतिवर्षी असे ४ वर्ष शिष्यवृत्ती मिळणार आहे.

२. DHBBC- डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेमध्ये पहिल्या फेरीत (लेखी परीक्षा) पुढील विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत १. ईशा संदेश रहाटे ६वी २. आर्यन आनंद सावंत ६वी ३.वैभव बाबासाहेब कांबळे ९वी. तसेच खालील विद्यार्थी प्रमाणपत्र धारक ठरले आहेत १.करण दिलीपकुमार कांबळे ६ वी २.निरंजन समीर सावरे ६वी ३.मृण्मयी सचिन पावसकर ६वी उत्तीर्ण होऊन प्रात्यक्षिक परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत.

३. BDS परीक्षेचा निकाल उत्तम लागला असून ०३ विद्यार्थी राज्याच्या गुणवत्ता यादीत आले आहेत.१.कुमार-विराज विजय बेंद्रे २.कुमार-.शिवम शरद बेंद्रे ३.कुमारी.बिल्वा अवधुत तेंडूलकर

४. सोलर कॅम्प कार्यशाळा : ऑक्टोबर २०१९ रोजी म.गांधी यांच्या १५० व्या जयंतीच्या निमित्ताने भारत सरकार व IIT मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने गांधी ग्लोबर सोलर योजना उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी स्वतः सोलर लॅम्प बनविले या वर्कशॉपमध्ये ५०सहभागी विद्यार्थ्यांना Dept.Of energy science and engineering IIT Bomay यांच्या मार्फत स्टुडंट सोलर अ‍ॅम्बेसिडर म्हणून प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

५. SOF सायन्स ऑलिंपियाड फाऊंडेशन मार्फत घेतल्या गेलेल्या NSO साठी ८ तर IMO साठी १३ विद्यार्थी प्रविष्ट झाले. कु.अनिशा आंबेकर हिला गोल्ड मेडल प्राप्त झाले.

६.दि.१५/०२/२०२० रोजी 'स्वराज्याचा लढा' या श्री.शिवाजी रायगड स्मारक मंडळामार्फत आयोजित परीक्षेला ६३ विद्यार्थ्यांचा सहभाग. व्याख्याते श्री.सुधीर थोरात यांच्या व्याख्यानाचा विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

* **स्पर्धा विभाग** – सन २०१९–२० या शैक्षणिक वर्षात विविध मंडळाच्या, संस्थांच्या,शालेय, तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर स्पर्धा घेण्यात आल्या. लोकमान्य टिळक वक्तृत्व स्पर्धा,पठण स्पर्धा (गीता पठण), मनाचे श्लोक, निबंध, सुलेखन, चित्रकला,भक्तीगीत गायन ,सूर्यनमस्कार, योगासन, रांगोळी, नाट्यवाचन, संस्कार भारती ज्ञान परीक्षा, समूहगीत गायन अशा अनेक स्पर्धांमध्ये शिर्के प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन उत्तम यश संपादन केले आहे.

* **NCC विभाग**– या वर्षी एन.सी.सी.ची सदस्य नोंदणी जुलैच्या पहिल्या आठवडयात झाली. प्रथम वर्षातील तनया मिलके,अथर्व परीट आणि राकेश दळी यांची Leading Cadets म्हणून नियुक्ती झाली. तर द्वितीय वर्षातील रसिका सरदेशपांडे, वेद लेले आणि अखिलेश लाकडे यांची P.O.Cadets म्हणून नियुक्ती झाली. सलग ४थ्या वर्षी प्रशालेला R.D. परेडसाठी निवड होण्यासाठी बहुमान मिळाला. रसिका सरदेशपांडे हीची Pre.R.D.साठी निवड झाली.

* **M.C.C विभाग** – महाराष्ट्र छात्र सेनेमार्फत सामाजिक जनजागृती विषयक प्रभात फेरी,माजी सैनिक कल्याण निधी कार्यालयामार्फत आयोजित कार्यक्रम इ.उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

* **राष्ट्रीय हरितसेना** – राष्ट्रीय हरितसेनेच्या अंतर्गत वृक्ष लागवड, इको फ्रेंडली गणेशोत्सव, फटाक्यांचे दुष्परिणाम स्पष्ट करणे असे अनेक उपक्रम घेण्यात आले.

* **बक्षिस वितरण विभाग** – बक्षिस वितरण विभागामार्फत बक्षिस समारंभ मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. विविध विषयात प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचे बक्षिस देऊन कौतूक करण्यात आले. प्रशालेच्या वतीने आदर्श विद्यार्थी विद्यार्थिनी बक्षिसे देण्यात आली.

* **विज्ञान विभाग**– पर्यावरण संस्था रत्नागिरी आयोजित निबंध स्पर्धा – या स्पर्धेत इ.९वी तील कुमार आदित्य आनंद पंडित या विदयार्थ्याला तृतीय क्रमांक (विभागून) मिळाला. आसमंत फांऊडेशन मार्फत भाटकर वाडा किल्ला येथे घेण्यात आलेल्या जैवविविधता अंतर्गत कार्यशाळेत इ.९वीतील १.कु.श्रुती साळवी २.कु.युसरा सय्यद.३.कु.रुची कांबळे ४.कुमार आदित्य भालेकर हे विद्यार्थी सहभागी झाले.या कार्यशाळेत झालेल्या मौखिक परीक्षेत कु.श्रुती साळवी ही यशस्वी झाली. भौतिकशास्त्र विषयाची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी गो.जो.महाविद्यालयात Come & Learn Physics कार्यशाळेत प्रशालेचे ४० विद्यार्थी सहभागी झाले. या विद्यार्थ्यांना प्रा.श्री.बेळेकर व त्यांचे सहकारी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. सॉल्टर्स केमिस्ट्री  कॅम्प, आयसर पुणे आयोजित तीन दिवसांच्या कार्यशाळेत १.कु.कुंजल कांबळे २.कु.पियुषा नवाळे ३.कु. आर्यन वाडेकर ४. कु.वैभव कांबळे या विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन हा कॅम्प यशस्वीरित्या पूर्ण केला. २८ फेब्रुवारी २०१९ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन संपन्न झाला. अटल टिकरिंग लॅब चे उद्घाटन र.ए.सोसायटीच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झाले. अटल लॅबच्या विद्यार्थ्यांनी एलईडीच्या माध्यमातुन विविध वैज्ञानिक उपकरणे तयार केली होती. त्यांचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. पर्यावरण बालनाटय महोत्सवामध्ये 'देता का हो कुणी घर,अन्न,पाणी' ही नाटिका सादर करण्यात आली. या नाटिकेला राज्यस्तरीय नाट्य स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाला. प्रशालेचे शिक्षक श्री.चव्हाण ए.पी.यांना उत्कृष्ट लेखन व दिग्दर्शनाचे पारितोषिक प्राप्त झाले. या नाटिकेसाठी श्री.गुळवणी सर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. प्रशालेत विज्ञान छंद मंडळ स्थापन करण्यात आले.मंडळामार्फत प्रश्नमंजूषा स्पर्धा,शालेय विज्ञान प्रदर्शन इ.उपक्रम राबवले गेले.

* **ग्रंथालय विभाग** : प्रशालेचे ग्रंथालय विविध प्रकारच्या ग्रंथानी समृद्ध असे आहे. ग्रंथालयात अनेक मान्यवर लेखकांची पुस्तके, वैज्ञानिक ग्रंथ, चित्रकला, नाटक, प्रवासवर्णन, ऐतिहासिक पुस्तके, इंग्रजी, हिंदी अशी सर्व प्रकारची एकूण १३५०० पुस्तके आहेत. विद्यार्थी ग्रंथालयाचा लाभ उत्तम प्रकारे घेतात. दरवर्षी जास्त पुस्तके वाचणाऱ्या विद्यार्थ्यांला 'कै.चंद्राबाई गीते वाचक पुरस्कार' दिला जातो. दि.१५ ऑक्टोबर या वाचन प्रेरणा दिनानिमित्त ग्रंथ प्रदर्शन भरवले गेले.

***संगणक विभाग** : प्रशालेमध्ये र.ए.सोसायटीने संगणक कक्ष चालू केला आहे. यामधे १७ संगणक आहेत. १ ली ते ८ वी पर्यतचे तसेच गुरुकुलचे विद्यार्थी संगणकाचे शिक्षण घेतात. संगणक सामान्यज्ञान परीक्षेमध्ये लहानगटामध्ये कुमार शर्विल सुधाकर खानविलकर याने तालुक्यामध्ये द्वितीय क्रमांक मिळवला आहे.

***स्काऊट / गाईड विभाग:** शैक्षणिक वर्ष २०१९-२० या कालावधीत स्काऊट-गाईड या विभागाने खूप उत्तम कामगिरी केली. जिल्ह्यातून युनिट नोंदणी व खरी कमाई प्रथम क्रमांक,संचलन द्वितीय, शेकोटी द्वितीय, शोभायात्रा द्वितीय, बिनभांड्याचा स्वयंपाक प्रथम, ५स्किल ओ रामा इत्यादी स्पर्धात बक्षिसे प्राप्त केली. विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे खालील विद्यार्थ्यांनी यावर्षी राज्यपुरस्कार प्राप्त केले. *राज्यपुरस्कार प्राप्त स्काऊट - कुमार योगिराज लोखंडे, कुमार प्रथमेश रसाळ, कुमार अनुराग कांबळे *राज्यपुरस्कार प्राप्त गाईड - कुमारी शृतिका शिंदे, कुमारी श्रावणी खामकर, कुमारी सोनम माळी, कुमारी सर्वेशा जाधव *.राज्यस्तरीय राज्यपुरस्कार स्पर्धेत ०८ विद्यार्थ्यांना राज्यपुरस्कार प्राप्त या विद्यार्थ्यांना मा.राज्यपालांच्या सहीचे प्रमाणपत्र प्राप्त होणार आहे.

***सालसेप** - शालेय किशोरावस्था जीवनकौशल्ये शिक्षण कार्यक्रम (राजू मीना कलामंच२०१९-२०) सालसेप अंतर्गत किशोरवयीन मुलीना मासिक पाळी व्यवस्थापन अंतर्गत (MHM) बद्दल इ.७वी ८वी च्या विद्यार्थिनीना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच किशोरावस्थेत होणारे शारीरिक, मानसिक, भावनिक बदलांविषयी माहिती त्याचबरोबर या काळात घ्यावयाची काळजी, आहार त्याचबरोबर समाजात या विषयी असणाऱ्या अंधश्रद्धा, गैरसमज याविषयी सौ.पाटील एस्.एन्.यांनी मार्गदर्शन केले.

*** सहल विभाग:** विभागामार्फत भीमा शंकर अभयारण्य,कोल्हापूर-गंधर्वपार्क,देवगड-मालवण इ.सहलींचे आयोजन करण्यात आले.

*** गरीब विद्यार्थी निधी:** ह्या विभागातर्फे गरीब व होतकरु विदयार्थ्यांना वह्या, गणवेश, बस पास शुल्क, एस.एस.सी.बोर्ड परीक्षा शुल्क, शालेय परीक्षा शुल्क इ.स्वरूपात मदत देण्यात येते. प्रशालेचे माजी विदयार्थी नंदादीप सुर्वे यांनी रु.५०००/-ची देणगी दिली.

*** तंबाखूमुक्त शाळा विभाग :** सलाम मुंबई फाऊंडेशन आणि शिर्के प्रशाला यांच्या संयुक्त विद्यमाने तंबाखू मुक्त शाळा अभियानांतर्गत तंबाखू मुक्त शाळा शपथ, मुख कर्करोग दिन, जागतिक कर्करोग दिन तसेच पोस्टर स्पर्धा व प्रदर्शन,मॉडेल स्पर्धा,चित्रकला स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

*** दत्तक पालक योजना:** सौ.सुरेखा राणे-अणेराव आणि संदीप राणे या दोन माजी विद्यार्थ्यांनी दोन विद्यार्थिनींच्या शालेय खर्चासाठी प्रत्येकी रु. ५०००/- ची देणगी दिली.

*** पालक शिक्षक संघ:** रा. भा. शिर्के प्रशाला, रत्नागिरी येथे शिक्षक पालक संघ स्थापन करण्यात आला. या संघामार्फत जनरल सभा, वर्गवार सभा भरवल्या गेल्या. तसेच शिक्षक पालक कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

*** विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य:**

१. श्री.विनोद शशिकांत मयेकर यांना २०१८-१९ चा महाराष्ट्र राज्य आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार प्राप्त

२. कोकण विभागीय मंडळाच्या अभ्यास मंडळ सदस्यपदी प्रशालेचे ज्येष्ठ शिक्षक व संस्थेचे सहकार्यवाह श्री.नथुराम तानाजी देवळेकर यांची निवड झाली.

३. प्रशालेच्या ज्येष्ठ शिक्षिका व आजीव सभासद मंडळच्या सदस्या सौ.स्नेहा दत्तात्रय साखळकर यांना लायन्स क्लबचा २०१८-१९ चा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त. पुरस्कारची रक्कम प्रशालेला देणगी म्हणून प्रदान करण्यात आली.

४. प्रशालेला केंद्र शासनाकडून अटल टिंकरिंग लॅब मंजूर

५. ३ नोव्हेंबर १९ रोजी प्रशालेत रा.भा.मेळा-२ संपन्न झाला. अनेक ज्येष्ठ माजी विद्यार्थी, माजी शिक्षक यांची उपस्थिती होती

* सेवानिवृत्ती: श्रीमती अंजली शरद बागवे या प्रशालेतील २८ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या.

प्रशालेला सदैव मार्गदर्शन देणारे सर्व संस्था पदाधिकारी, नियामक मंडळ, पालकवर्ग, माजी मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वर्ग या सर्वांचा प्रशालेतर्फे ऋणनिर्देश करीत आहोत. धन्यवाद !

**श्री. विजय साखळकर**
*शालेय समिती अध्यक्ष*

**श्रीमती गायत्री गुळवणी**
*प्रभारी मुख्याध्यापक*